ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-5 No. 2 January–December 2020

# भारतीय शेतीपद्धती मध्ये बदल करण्याची गरज एक अभ्यास

**प्रा. डॉ. बी. एम. वाघमोडे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख ,
एस.एस.जी.एम.कॉलेज,कोपरगाव
मो.नं. ९४०३३७४९२३
इमेल- balawaghmode24.3@gmail.com

गोषवारा :

भारतीय शेतीमध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली असून रासायनिक शेती कालबाह्य होत चालली आहे. उत्पादन खर्चात मोठया प्रमाणात बचत केल्याशिवाय शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारणार नाही आणि त्यांना त्यांच्या श्रमाची वाजवी किंमत मिळणार नाही. उत्पादन खर्चावर आधारित भाव मागणे म्हणजे शेतकऱ्यांना कायमचे दारिद्र्यात ठेवणे होय. कुठेही उत्पादन खर्चावर भाव आधारल्या जात नाहीत. भाव फक्त मागणी आणि पुरवठा या तत्वावरच ठरवले जातात. आता जागतिक स्पर्धेत टिकायचे असेल तर उत्पादन उत्पादन खर्च कमी करून उत्पादनाची गुणवत्ता वाढवावी लागेल व त्यावर आधारित भाव मिळवावे लागतील. आज विषमुक्त अन्नाची गरज श्रीमंत देशातील नागरिकांना भासत आहे. त्यांना पाहिजे तसा माल भारतीय शेतकरी तयार करू शकतो पण त्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेती करण्याच्या पद्धतीमध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**१.प्रस्तावना :**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातील शेतकऱ्यांची गरिबी दूर होईल, ही अपेक्षा व्यर्थ ठरली. इतकेच नाही तर शेतकरी कायमचे गरिबीत कसे राहतील, अशी व्यवस्था अनेक शासकीय योजनांमुळे निर्माण झाली. बाहेरच्या देशातील तंत्रज्ञान आयात करून उत्पादन वाढीसाठी ते तंत्रज्ञान वापरण्यास शेतकऱ्यांना बाध्य केले गेले. जरूर नसणारी रसायने वापरण्यावर भर दिला गेला. हरितक्रांतीच्या नावाने भारताची शेती आणि जीवनपद्धती नष्ट करण्याचे काम नव्या कंपन्या चालवण्याच्या उद्धेशाने केले गेले. अर्थात शेतकरी वर्ग अनेक प्रकारची रासायनिक खते आणि कीटकनाशके शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी वापरू लागले. या विषारी पदार्थांमुळे जमीन निर्जीव होऊ लागली आणि आज या निर्जीव जमिनीतून शेतकरी कोणतेही जादा उत्पन्न मिळवण्यात असमर्थ झाला आहे. शेती उत्पादक कर्जात बुडाला आहे. कित्येक शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याखेरीज पर्याय उरलेला नाही, ही शेतकऱ्यांची स्थिती आहे.

२. अभ्यास विषयाचे महत्व:


Copyright © 2020 Authors

जगात शेतीचा शोध लागल्यापासून आताच्या स्थिती पर्यंत शेती पद्धतीमध्ये मोठे बदल होत गेले आहेत. काही बदल हे फायद्याचे ठरले तर काही आता तोट्याचे ठरत आहेत. असे जरी असले तरी प्राचीन काळापासून शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा बलदंड आधार आहे. आजही भारतीय अर्थव्यवस्थेतील लोकसंख्येचा मोठा भाग उपजिवेकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. वाढत्या लोकसंख्येला शेतीने रोजगार पुरवलेला आहे. शेतीमधूनच आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास होत गेलेला आहे. वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागवण्यासाठी स्वातंत्र्या नंतरच्या काळात शेती उत्पादनात वाढ करण्याचा अनेक मार्गांनी प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच याच काळात शेतीचे संक्रमण निर्वाहपर शेतीतून व्यापारी शेतीत घडून आल्याने महत्व प्राप्त होते.

अभ्यास विषयाची निवड करताना शेती शोधानंतर त्यामध्ये कशा पद्धतीने बदल होत गेले, आता शेती कशा पद्धतीने शेती केली जात आहे आणि करण्याची गरज आहे. जिथे रासायनिक खते, कीटकनाशके आणि पाणी यांचा बेसुमार उपयोग केला जात आहे. ती जमीन आता उत्पादन योग्य राहिली नाही. त्यामुळे उत्पादनात घट आणि उत्पादन खर्चात वाढ होत चालली आहे. अनेक शेतकरी शेती सोडण्याच्या व पळून जाण्याच्या विचारात आहेत. परंतु जाणार तरी कुठे? उद्योगधंद्यामध्ये आता मंदी आली आहे. उद्योग, असलेले कामगार कसे कमी करता येतील, याचा विचार करत आहेत. सरकारी नोकऱ्यातील भरती जवळपास बंद झाली आहे. अशावेळी भारतीय शेती मध्ये बदल केले गेले तरच येणाऱ्या काळात तरुणांना काम देणे शक्य आहे म्हणून सदर विषयाची अभ्यासासाठी निवड केली आहे.

**३. अभ्यास विषयाची व्याप्ती :**

भारतीय शेतीपद्धती मध्ये बदल करण्याची गरज एक अभ्यास या विषयाचा अभ्यास करताना शेतीची सुरुवात आणि शेतीची आज पर्यंतची वाटचाल याचा थोडक्यात एतिहसिक आढावा घेऊन सेंद्रिय शेतीची गरज यावरती थोडक्यात या प्रस्तुत शोध निबंधांमध्ये चर्चा केलेली आहे.

४. अभ्यासाची उदिष्ट्ये :

१. शेतीच्या उगमस्थानांचा शोध घेणे.

२. भारतातील पुरातन कृषीचे स्वरूप अभ्यासणे.

३. इंग्रज राजवटीतील भारतीय कृषी जाणून घेणे.


Copyright © 2020 Authors

४. हरितक्रांतीच्या काळात शेतीमध्ये झालेल्या बदलांचा आढावा घेणे.

५. सेंद्रिय व कंत्राटी पद्धतीच्या शेतीची गरज अभ्यासणे.

६. २१ व्या शतकातील भारतीय कृषी कशी असावी यावर चर्चा करणे.

**५. अभ्यास विषयाची गृहीतके :**

१. आपल्या देशा अगोदर काही देशात शेती केली जात होती.

२. भारतीय कृषी पद्धतीला इतिहास आहे.

३. इंग्रज राजवटीत भारतीय कृषी कुंठीत अवस्थेत होती.

४. हरितक्रांती काळात भारतीय कृषित बदल झालेला आहे.

५. सेंद्रिय व कंत्राटी कृषी वर्तमानात फायदेशीर ठरत आहे.

६. २१. व्या शतकातील कृषी काही निकष सिद्ध करणारी असावी.

**६. संशोधन पद्धती :**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी दिव्तीय साधनसामग्रीचा आधार घेतलेला आहे. यामध्ये विविध संदर्भग्रंथ, नियतकालिके,वर्तमानपत्रे, मासिके, शोधनिबंध, इंटरनेट वेबसाईट इ. चा यामध्ये समावेश होतो. वरील दिव्तीय स्त्रोतांमधून माहिती संकलित करून त्याचे विश्लेषण केलेले आहे व त्या विश्लेषणावरून अभ्यास विषयाचे काही प्रमुख निष्कर्ष काढलेले आहेत.

**७.अभ्यास घटकांचे विश्लेषण :**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी जी उदिष्ट्ये ठेवण्यात आलेली होती त्या घटकांचे पुढीलप्रमाणे थोडक्यात स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे.

१. कृषी उगमस्थान :

 Copyright © 2020 Authors

जगात कृषीचा शोध हा साधारणपणे १० हजार वर्षापूर्वी प्रथम मध्यपूर्वेतील आताचे सिरीया,

लेबनॉन, कुवेत, इराक, इस्राईल व जॉरडन या देशातील लगतच्या प्रदेशांचा मिळून जो अर्धचंद्राकृती आकार तयार होतो त्या सुपीक प्रदेशात लागला. प्रत्यक्ष शेतीला सुरुवात करण्यापूर्वी मानव त्यांच्या आजूबाजूच्या भागातील वनस्पतींचे निरीक्षण करून त्यातील खाद्‌योग्य अन्न व विशेषतः बियाणांचे निरीक्षण करत होता. उपयुक्त असलेली बियाणे ठेऊन ती पुढील वर्षीच्या हंगामात पेरता येऊ शकतात व एका बियाणाच्या पेरणीतून उगवलेल्या ताटातून तोडणीनंतर कितीतरी जादा बियाणे गोळा करता येतात हे समजल्यानंतर शेतीतील अन्ननिर्मितीचे तंत्रच मानवाच्या हाती आले. सुरुवातीच्या काळात हातानेच शेतीची मशागत, पेरणी व इतर कामे व्हायची पुढे पशुधनाच्या सहाय्याने शेती होऊ लागली. सुरुवातीच्या कालखंडात गवतांच्या काही जातीमधून गहू, डाळींचे प्रकार शोधण्यात आले. त्याचा उपयोग अन्न म्हणून होऊ लागला. याच भागात पशुपालनाचा शोध लागल्यानंतर दुधजन्य पदार्थांचाही अन्नात समावेश झाला. मध्यपूर्वेतील शेतीचा प्रसार हळूहळू इजिप्त, आशिया खंडातील इतर देश आणि युरोपमध्ये झाला.मध्य पूर्वेतील शोधानंतर भारतात ही शेती पद्धती जवळपास ३५०० वर्षानंतर पोहचली असे मानले जाते. म्हणजेच भारतीय शेतीला ६५०० वर्षांचा इतिहास आहे असे समजण्यास हरकत नाही. यामधूनच कृषीचे उगमस्थान व तिचा झालेला प्रसार या विषयीची माहिती मिळते.

## २. पुरातन काळातील भारतीय कृषी :

पुरातन काळातील शेतीमध्ये काटक बियांचा वापर, मातीचा पोत टिकवून ठेवणे आणि शेती

मधील जैवविविधता असे तीन प्रमुख आधार होते. या मजबूत पायावरच भारतीय शेती गेली साडे सहा हजार वर्षे टिकून राहिल्याचे दिसते. पाणी, माती व जंगले यांचे जतन करणे गरजेचे आहे, याची जाणीव त्यावेळी लोकांना होती. जंगलांचा शेती उत्पादनासाठी असलेला संबंध त्यांना माहित होता. दक्षिण भारतात तलाव राखल्या जाऊन त्यातून शेतीसाठी पाटाने पाणी देण्याची व्यवस्था होती. शेतीतील बरीचशी कामे सामुहिक पद्धतीने केली जायची. दुष्काळावर मात करण्याची सामाजिक व्यवस्था होती. त्यात गावपातळीवर पेवासारखी अडचणीच्या काळात मदतीला येईल अशी धान्य साठवणुकीची व्यवस्था होती. म्हणूनच इंग्रज राजवट सुरु होण्यापूर्वीच्या आधी २ हजार वर्षाच्या काळात अनेक दुष्काळ येऊन गेले तरी मनुष्यहानीची इतिहासात कुठेच नोंद झालेली नाही.

## ३. ब्रिटीश काळातील भारतीय कृषी :

देशावर ब्रिटीश सत्तेचा अंमल होण्या पूर्वीच्या काळापर्यंत शेती स्वायत्त होती. शेती मधून काय पिकवायचे व कसे पिकवायचे आणि मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग कसा करायचा याचे निर्णय स्वातंत्र्य शेती उत्पादकांना होते. ब्रिटीश काळात मात्र शेतकऱ्यांच्या निर्णय स्वातंत्र्यावर बंधने आली. प्रथमतः जंगलावरचा लोकांचा अधिकार काढून घेतला. जमिनींवरील शेतसारा

 Copyright © 2020 Authors

वाढवण्यात आला. पिके येऊ न येऊ ठरवलेला शेतसारा शेतकऱ्याना देणे बंधनकारक केले. शेतकऱ्यांच्या अन्नविषयक गरजा पूर्ण करणाऱ्या पिकांपेक्षा कापूस, नीळ, उस, भूईमुग अशा नगदी पिकांवर ब्रिटिशांकडून भर देण्यात येऊ लागला. ब्रिटीशांच्या या धोरणाची परिणीती शेती उत्पादकाची आर्थिक पिळवणूक व अन्नधान्याची टंचाई निर्माण करण्यात झाली. या चुकीच्या धोरणामुळे जमीनदार व सावकारांचा नवीन वर्ग तयार होऊन शेतकऱ्यांच्या लुटमारीला सुरुवात झाल्याचे दिसून येते. बळजबरीने शेतसारा वसूल केल्याने शेतकरी कर्जबाजारी होऊ लागले आणि कर्ज वेळेत न फेडता आल्यामुळे सावकारांनी शेती बळकावण्यास सुरुवात केली. या काळात ग्रामीण भागातील गरिबीत मोठया प्रमाणात वाढ झाली. या सर्व बाबीमुळे देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या काळापर्यंत शेती व्यवसाय संकटात सापडला. ब्रिटीश काळात जवळपास अकरा दुष्काळ येऊन गेले. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे लाखो लोक मृत्यूमुखी पडले. एकूणच ब्रिटीश काळातील शेती उत्पादक व सामन्य जनतेचे प्रचंड हाल झाल्याचे दिसून येते.

४. हरितक्रांतीच्या काळातील भारतीय शेती :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यकर्त्यांपुढे शेती धोरण विषयक वेगवेगळया प्रकारची आव्हाने होती. वाढत्या लोकसंख्येसाठी पुरेशा अन्नधान्याची समस्या तर होतीच शिवाय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच काही वर्षांमध्ये आलेल्या दुष्काळांचीही भर पडली. या सर्व भूमीवर सुरुवातीच्या काळात शेती विकासाला प्राधान्य देऊन अन्नधान्य उत्पादन वाढवण्याचे प्रयत्न झाले. परंतु पाहिजे त्या प्रमाणात यश प्राप्त झाले नाही. त्यामुळे अमेरेकेसारख्या देशातून अन्नधान्याची आयात करावी लागत होती. यावर उपाय म्हणून मागील शतकाच्या मध्यात देशाला अन्नधान्य अन्नधान्य निर्मितीत स्वयंपूर्ण करण्यासाठी हरितक्रांतीच्या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे धोरण केंद्र सरकारतर्फे स्वीकारण्यात आले. हरितक्रांतीच्या तंत्रज्ञानामध्ये जास्त उत्पादन देणारी उन्नत बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके अशा त्रिसूत्रीचा समावेश होता. यातून संकरीत बियाणांचा जन्म झाला आणि उत्पादन वाढीला चालना मिळाली.परंतु हरितक्रांतीच्या काळात शेती करताना रासायनिक खते किटकनाशकांचा वापर कारणे अनिवार्य बनले. हरितक्रांतीची सुरुवात प्रथम गहू व तांदूळ या दोन महत्वाच्या धान्य पिकांपासून झाली. नंतर इतर पिकांच्या बाबतीतही तंत्रज्ञानाचा अवलंब झाला. या तंत्रज्ञानाला शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात स्वीकारल्यामुळे नंतरच्या काळात भारतातील अन्नधान्याच्या उत्पादनात प्रचंड मोठया प्रमाणात वाढ झाली. स्वातंत्र्यानंतर एकेकाळी अन्नधान्याची आयात करणारा आपला देश काही काळ निर्यात करू लागला. हे हरितक्रांतीचे यश म्हणून आपल्याला उल्लेख करता येईल. या तंत्रज्ञानाचे दुष्परिणाम देखील गेल्या काही काळात मोठया प्रमाणात दिसून येऊ लागले आहेत. ते आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय अशा तीन प्रकारचे आहेत. हरितक्रांतीच्या काळात तयार करण्यात आलेल्या तंत्रज्ञानाचा मोठया प्रमाणात वापर केल्यामुळे शेती उत्पादनात मोठी वाढ घडून आली. उत्पादनवाढीची पातळी कायम ठेवण्यासाठी रासायनिक खतांबरोबरच कीटकनाशकांचा वापर भरमसाठ वाढला. मध्यंतरीच्या यांच्या किमतीत

 Copyright © 2020 Authors

भरमसाठ वाढ झाली. त्यामुळे शेतीतील खर्च वाढत गेला व उत्पन्नात घट होत गेली आणि त्या प्रमाणात सेती उत्पादनाच्या बाजार भावात वाढ झाली नाही. या सर्व बाबींचा परिणाम शेतीतील नफा कमी होण्यात व शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढण्यात झाला. वेळीच कर्जफेड न करू शकल्यामुळे भारतीय शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात असे वाटते. भारतीय शेतीची दुरवस्था दाखवणारे हे गंभीर चित्र आता समोर येत आहे.

हरितक्रांती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे जमिनीची होत असलेली धूप, पाण्याच्या अतिउपशामुळे भूगर्भातील पाण्याची खोल चाललेली पातळी, क्षारपड होत असलेली जमीन, जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे कमी झालेले प्रमाण व त्यामुळे सुपीकता मध्ये होत असलेली घट, तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे जमीन व पण्याचे प्रदूषण यामुळे विषयुक्त तयार झालेली अन्नसाखळी या सर्वांचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम असे आज कितीतरी प्रश्न निर्माण झालेले आहेत. म्हणूनच खऱ्या अर्थाने आज भारतीय शेती पद्धती मध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे असे वाटते.

५. सेंद्रिय व कंत्राटी शेती पद्धतीची गरज :

हरितक्रांतीच्या नंतरच खऱ्याअर्थाने सेंद्रिय शेतीची गरज जाणवू लागली आहे. पिकांना हवे असणारे अन्नद्रव्य जेंव्हा हवे आणि जितके हवे तितके मिळवून देण्याची व्यवस्था निसर्गातच असते हे समजून घेणे आज गरजेचे बनलेले आहे. रसायनांचा इतिहास पाहता तो जास्तीत जास्त दोनशे वर्षांचा आहे. वनस्पती मात्र मानव जन्मापूर्वी हजारो वर्ष आधी निर्माण केली गेली हे आज विसरता येणार नाही. सेंद्रिय शेती पद्धतीत निसर्ग नियमांचा आधार घेतला जातो. त्यामुळे स्थानिक संसाधनाच्या मदतीनेच शेती केली जाते. त्यामुळे उत्पादन खर्चात घट होऊन त्याच्या उत्पादनात वाढ होते. त्यामुळे त्याला कोणत्याच पिक कर्जाची आवशकता जास्त प्रमाणात भासत नाही. या ठिकाणी शेतकरी पूर्णपणे स्वालंबी असतो. मात्र मेहनत करण्याची आवशकता असते. आपण आता वापरत असलेली पोषण पद्धती बंद करून जमिनीतून जे जे घेतले जाते तेच जमिनीला परत करण्याची व्यवस्था केली तर जमिनीची सुपीकता टिकून उत्पादनात वाढ घडून येते. त्यामुळे रासायनिक खतांचा वापर पूर्णपणे टाळता येणे शक्य आहे. येथे जे निर्माण झाले तेच शेतीला परत दिल्याने आपली शेती दिवसेंदिवस अधिक उपजाऊ बनते. हे एकदा समजले कि शेतीसाठी बाह्य घटकांची गरजच नाही हे स्पष्ट होईल. आज भारतीय शेतकरी लाखो रुपये रासायनिक खते, किटकनाशकेबी, हायब्रीड बियाणे यावर खर्च करत आहे. त्यामुळे उत्पादन खर्च वाढून तो कर्जबाजारी होताना दिसून येत आहे व कर्जमुक्तीसाठी रस्त्यावर उतरून आंदोलने करत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहय्याने केलेल्या शेतीतील उत्पादनाला आज बाजारपेठेत व इतर देशात मागणी कमी होताना दिसून येत आहे. त्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात व होत असणारा खर्च सुद्धा आता भारतीय शेती उत्पन्नातून भरून निघत नसल्याचे चित्र समोर दिसत आहे. आज आधुनिक पद्धतीच्या शेती उत्पादनाचे मानवाच्या आरोग्यावर दुष्परिणाम होताना दिसून येत असल्याने या उत्पादनापासून मानव दूर चालला असून सेंद्रिय

 Copyright © 2020 Authors

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-5 No. 2 January–December 2020

शेती उत्पादनाला जवळ करत आहे. सेंद्रिय उत्पादन हे विषमुक्त असल्यामुळे त्यांच्या सेवनाने जनतेचे आरोग्य सुधारेल, प्रदूषण थांबेल, बाजारपेठेत उत्पादनाला जादा मागणी येऊन उत्पन्नात वाढ होईल त्यामुळे त्यांच्या नफ्याच्या प्रमाणात ही वाढ होईल. ही गोष्ट भारतीय शेतकरी जितक्या लवकर समजून घेईल तितक्या लवकर त्यांना उत्पादन वाढ, उत्पन्न वाढ आणि चांगले आरोग्य प्राप्त होईल म्हणूनच २१ व्या शतकात सेंद्रिय शेती करणे काळाची गरज बनून भारतीय शेतकऱ्यासाठी ती एक संधी बनली आहे.

कंत्राटी शेती म्हणजे उत्पादक आणि खरेदीदार यांच्यात झालेल्या वायदेकरारानुसार शेती उत्पादन आणि पुरवठ्याच्या व्यवस्थेला कंत्राटी शेती असे म्हणतात. कंत्राटी शेतीमुळे शेतकऱ्यांना पतपुरवठा सुलभतेने होऊ शकतो. उत्पादनासाठी आवश्यक दर्जेदार वस्तूची खरेदी शक्य होते आणि मुख्य म्हणजे बाजारातील मागणी आणि मुल्यांमधल्या चढउतारांमुळे येणारी जोखीम कमी होते. कृषी उत्पादनाच्या खरेदीदारांना दर्जेदार मालाचा खात्रीशीर पुरवठा होण्याची हमी मिळाल्याने लाभ होतो. कंत्राटी शेतीच्या आतापर्यंतच्या अनुभवातून ती अनेक दृष्टीने लाभदायक असल्याचे दिसून आले आहे. मात्र हे करत असताना त्यासोबतच शेतकऱ्यांच्या संघटनांचा, स्वयंसेवी संस्थांचे आणि शासनाचे पाठबळ किंवा सहभाग या गोष्टी ही आवश्यक आहेत. त्यामुळे कंत्राटी शेती ही २१ व्या शतकात शेतकऱ्यांच्या अधिक हिताची ठरू शकेल.

६. बदलत्या शेती पद्धतीचे निकष :

बदलती भारतीय शेती ही, आताच्या शेती पद्धतीत बदल करून ती, नव्या विज्ञानावर आधारित असावी, शेतीची उत्पादन क्षमता वाढवणारी असावी, पर्यावरण संवर्धन करणारी असावी, शेती उत्पादकांना आत्मनिर्भर व कर्जमुक्त करणारी असावी, गावात रोजगार निर्मितीत वाढ निर्माण करणारी असावी, विषमुक्त अन्न उत्पादन करणारी असावी, ज्ञानवंताला आकर्षित करणारी असावी आणि वाढत्या लोकसंख्येला पुरेसा अन्नधान्य पुरवठा करण्यास समर्थ असावी. या निकषावर आधारित आणि हे निकष सिध्द करणारी शेती असावी.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासावरून काही महत्वपूर्ण निष्कर्ष निघतात ते पुढीलप्रमाणे :

१. जगात शेतीचा शोध हा साधारणतः दहा हजार वर्षापूर्वी मध्यपूर्वेतील सुपीक प्रदेशात लागला असून भारतीय शेतीला साधारणतः सहा हजार पाचशे वर्षाचा इतिहास असल्याचे दिसून येते.


Copyright © 2020 Authors

२. पुरातन काळातील भारतीय शेती पद्धतीमध्ये पाणी, माती, जंगले यांचे चांगल्या पद्धतीने जनतेने जतन करून येणाऱ्या संकटावर कशा पद्धतीने मात करता येईल हे त्यांनी दाखवून दिल्याचे दिसून येते.

३. इंग्रज काळात ब्रिटीशांनी भारतीय शेतकऱ्यांवर अनेक प्रकारची बंधने घालून त्यांची आर्थिक, सामाजिक व राजकीय पिळवणूक केल्याचे अभ्यासावरून दिसून येते.

४. हरितक्रांतीच्या काळात भारतीय शेती उत्पादनामध्ये प्रचंड मोठया प्रमाणात वाढ घडून आली. मात्र सर्व शेती उत्पादनामध्ये ती झाली नाही. तसेच त्या शेती उत्पादनाचा मानवाच्या आरोग्यावर हळूहळू दुष्परिणाम होत असल्याचे काही तज्ञानांचे मत असल्याचे दिसून येते. त्यामुळे शेती पद्धती मध्ये बदल करण्याची गरज असल्याचे वाटते.

५. सेंद्रिय व कंत्राटी शेती पद्धतीतून उत्पादन खर्चात घट होऊन शेतकऱ्यांच्या उत्पादनात, उत्पन्नात, जमिनीच्या सुपीकते मध्ये वाढ होऊन ती भविष्यकाळात अधिक फायदेशीर ठरणार असल्याचे दिसून येते.

६. २१ व्या शतकातील शेती ही खरोखरच या निकषांच्या आधारावर केली गेली तर भारतीय शेतकऱ्यांना ती अधिक आत्मनिर्भर बनवेल.

सारांश:

भारत मातेला पुन्हा सूजलाम सुफलाम करून सुवर्ण भूमीचा मान मिळवून देण्याची जबादारी भारतीय शेतकऱ्यांची आहे. भारतीय शेतकरी हे सहज करू शकतात. त्यासाठी एक प्रकारची संपूर्ण क्रांती अपेक्षित आहे. भारतीय शेतीला नवी दिशा देण्याची गरज ओळखून आमचे शेतकरी जितक्या लवकर सेंद्रिय व कंत्राटी शेती पद्धतीचा स्वीकार करून बदल घडवून आणतील तितक्या लवकर देशाचा, शेतीचा व शेतकऱ्यांचा याही पेक्षा चांगल्या गतीने विकास घडून येईल असे नमूद करावे वाटते.

संदर्भसूची:

१. पाटील एन.डी., आपली जमीन आणि शेती, कॉनटीनेन्तल प्रकाशन, पुणे, १९९३.

२. डॉ. गायकवाड मुकुंद, करार शेती आणि कंपनी शेती, गोडवा प्रकाशन, पुणे, २००६.

३. डॉ. वाणी नीता, कृषी अर्थशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१४.

 Copyright © 2020 Authors

४. मुणगेकर भालचंद्र, भारतातील आर्थिक सुधारणा आणि दलित एक आंबेडकरी दृष्टीकोन, सुगावा प्रकाशन, पुणे, २००३.

५. भोसले प्र.बा., आपण शेतकरी आणि आपला समाज, कृषी ग्रंथ भांडार प्रकाशन, पुणे, २०१०.

६. लांजेवार नरेंद्र, शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंतन आणि उपाय, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, २००७.

७. डॉ. गायकवाड मुकुंद, शेतीचा विकास काल – आज – उद्या,कॉनटीनेन्तल प्रकाशन, पुणे, २००३.

८. हाके गणेश, संपादक, अग्रोटेक, मासिक, मे, २०११.

९. अर्थसंवाद, खंड ३८, अंक ४, जाने – मार्च २०१५.

१०. योजना अंक ६, एप्रिल २०१६.

 Copyright © 2020 Authors